**प्रतिवादींतर्फे उलटतपास श्री. ए. जी. देशपांडे वकील यांचे मार्फत.**

**४.** माझे एम.ए. पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मला वादी क्र. २ ते ७ यांनी त्यांच्या वतीने पुरावा देण्याबाबत वटमुखत्यारपत्र दिलेले आहे. मी त्याची प्रत न्यायालयात दाखल केलेली नाही.

५. दावा मिळकत नगरभूमापन क्र. ३८८ चे एकूण क्षेत्र ६६० चौ.फूट आणि ३८९ चे १९८.६ चौ.फूट आहे. त्या दोन्ही जागेंचे स्वतंत्र नकाशे आहेत. मला दाव्यामध्ये कोणत्या मिळकतीच्या चर्तुःसिमा नमूद केल्या आहेत ते आता मला आठवत नाही. मी माझ्या शपथपत्रात दावा मिळकत क्र. ३८८ व ३८९ च्या चर्तुःसिमा नमूद केल्या आहेत. नगरभूमापन क्र. ३८८ च्या पुर्वेला धनुकटे गल्लीचा रस्ता, पश्चिमेला चव्हाण यांचे घर, उत्तरेला मारुती धनुकटे व भिमराव चव्हाण यांचे घर आणि दक्षिणेला आमचे घर व पड आहे. नगरभूमापन क्र. ३८९ च्या पुर्वेला रस्ता, पश्चिमेला आमचे स्वतःचे घर, दक्षिणेला रस्ता व उत्तरेला रामा धनुकटे आणि कृष्णा चव्हाण यांचे घर आहे.

६. लक्ष्मण नरहरी कांबळे सन १९६८ साली वारले असून त्यांची पत्नी तुळसाबाई सन १९७० साली वारलेली आहे. त्यांना बंडू, शिवराम, भागोजी आणि दत्तू अशी चार मुले होते. माझे आजोबा बंडू सन १९८१ साली मयत झाले असून त्यांना आत्माराम, आनंदा, चंद्रकांत, काशिनाथ व वसंत अशी पाच मुले आणि विद्या, वासंती, सोनाबाई व विमल अशा मुली होत्या. आज रोजी विद्या व वासंती मयत असून त्यांचे वारस हयात आहेत. मला त्याबाबत माहिती आहे. सध्या सोनाबाई कोल्हापूर व विमल मुंबईमध्ये राहत आहेत.

७. माझे वडिल आत्माराम सन १९९६ साली मयत झाले आहेत. माझे काका शिवराम मयत असून त्यांना जितेंद्र व रविंद्र अशी दोन मुले आणि मनिषा नावाची एक मुलगी आहे. काका दत्तू यांची दोन्ही मुले मयत असून बेबीताई, सुमन व वंदना अशा तीन मुली होत्या. त्या आजरोजी हयात आहेत.

८. माझ्याकडे गजरगाव गावठाणातून खुले परडे मिळकत दक्षिणोत्तर लांबी ६० फुट व पुर्व-पश्चिम रुंदी १५ फूट ही आण्णाप्पा लक्ष्मण लांडे यांची होती असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा आहे. माझ्याकडे त्या खरेदीपत्राची नक्कल आहे. मला लक्ष्मण लांडे यांची वंशावळ

माहित नाही. माझा जन्म दि. ०१.०६.१९८६ रोजी झाला आहे. सदर मिळकत लक्ष्मण कांबळे यांनी दि. २६.०२.१९५५ रोजी खरेदी केली होती. त्याचा मूळ दस्त मिळालेला नसल्यामुळे मी त्याची प्रमाणित प्रत पाहिलेली आहे. त्या खरेदीखताप्रमाणे सदर मिळकतीच्या पुर्व व दक्षिण बाजूस रस्ता आहे.

**प्रश्न** – सदर मिळकतीच्या खरेदीखतावरती ग्रामपंचायत क्रमांक नमूद होता काय ?

**उत्तर** – त्यावेळी ग्रामपंचायत अस्तीत्वात नसल्यामुळे मिळकतीचा क्रमांक नमूद नव्हता.

९. मी त्या मिळकतीचा फाळा लक्ष्मण कांबळे भरत असल्याबाबत सन १९७३ पासूनची कागदपत्रे हजर केली आहेत. मला त्या मिळकतीचे वाटप कधी व कसे झाले याची माहिती नाही. मला ते वाटप कोणासमक्ष झाले याची माहिती नाही. माझ्याकडे सदर मिळकत बंडू कांबळे यांच्या हिस्याला आल्याचे दाखविणारा कागदोपत्री पुरावा नाही. बंडू व त्याच्या भावंडांमध्ये सदर मिळकतीच्या वाटणीबाबत कोणताही दिवाणी दावा झाला नव्हता. आमच्या आत्यांनी वडिल व चुलत्यांच्या हक्कात कोणतेही नोंदणीकृत हक्कसोडपत्र लिहून दिलेले नाही. मला मयत शिवराम, भागोजी व दत्तू यांच्या वारसांनी हा दावा दाखल करण्याकरीता वटमुखत्यारपत्र दिलेले नाही.

१०. मी पुर्वी दाखल केलेला नि.दि.दावा क्र. २७/२०१० मधील वाद आणि या दाव्यातील वाद एकसारखा असून दोन्ही दाव्यातील मिळकती समान आहेत. मला जून २००६ मध्ये दावा मिळकतीच्या सिटी सर्वेच्या सनदेची माहिती झालेली होती. मी त्याबाबत सिटी सर्वे कार्यालयात अपिल दाखल केले होते. त्या अपिलाची पुणे येथे चौकशी झाल्यानंतर ते कोल्हापूरला पाठविले होते. ते प्रकरण आजदेखील प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते प्रकरण सदर कार्यालयाने नामंजूर केले आहे.

११. मला सदर प्रकरण सिटी सर्वे कार्यालयाकडे प्रलंबित असल्याचे सांगता येणार नाही. सिटी सर्वे क्र. ३९० ला मयत लक्ष्मण नरहरी कांबळे यांचे नाव नाही. माझ्याकडे सिटी सर्वे नं. ३९० मध्ये असलेली खोली काळू कृष्णा कांबळे यांच्या नावाची असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा आहे. माझ्याकडे ती खोली लता आत्माराम कांबळे हिला दिल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा आहे. मी तो न्यायालयात दाखल केलेला नाही. मला तो हजर करण्यास कोणतीही

अडचण नव्हती. मी नि.दि.दावा २७/२०१० हा प्रतिवादींचे पुर्वहक्कदार दावा मिळकतीत शौचालय, स्नानगृह व गोबरगॅसच्या टाकीचे बांधकाम करत असल्याबाबत दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याची साधारणतः चार लाख रुपयांच्या आसपास किंमत असावी. मला त्याची निश्चित किंमत सांगता येणार नाही.

**१२**. माझ्याकडे प्रतिवादींनी दावा मिळकतीत अतिक्रमण केल्याबाबतचा सरकारी नकाशा नाही. मी सिटी सर्वे क्र. ३८९ मध्ये दोन वर्षापुर्वी घराचे बांधकाम केले असून त्याला ग्रामपंचायत मिळकत क्र. २३१, २३५ व २३६ देण्यात आलेले आहेत. मला त्यांचे एकूण क्षेत्र सांगता येणार नाही. मी बांधलेल्या घरांबाबत अतिरिक्त पुराव्याचे शपथपत्र देताना माझ्या वकिलांना माहिती दिली होती. सदर बाब माझ्या अतिरिक्त शपथपत्रामध्ये नमूद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही.

**१३**. सिटी सर्वे क्र. ३८८ ची नोंद घेताना त्यामध्ये घर व खुली जागा होती. त्यावेळी गजरगाव ग्रामपंचायत अस्तीत्वात होती. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी सिटी सर्वे क्र. ३८८ मध्ये खुल्या जागेची नोंद आहे. मी सांगितलेल्या खुल्या जागेचे क्षेत्र ६६० चौ.फूट आहे. मला दाव्यात नमूद केलेली खुली जागा आज रोजी कोणत्या सिटी सर्वेमध्ये नमूद आहे याबाबत सांगता येणार नाही.

**उलट तपास अपुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by
RAVI PANDURANG
THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १२.०८.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.